# महापालिकेत मतदारांसाठी हेल्पलाईन कक्ष

**प्रतिनिधी** / ५ ऑक्टोबर

**नांदेड** : महापालिकेच्या मुख्यालयात मतदारांसाठी हेल्पलाईन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कक्षात ६ ते १० ऑक्टोबर या कालावधीत सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजतापर्यंत व प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजतापर्यंत काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कक्षात दुरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून मतदार यादीतील नाव शोधण्यासह अन्य माहितीसाठी मतदार या कक्षास संपर्क साधू शकतात.

महापालिका निवडणूकीसाठी ११ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदारांना केंद्राचे नाव, ठिकाण, मतदाराचा अनुक्रमांक व बुथ क्रमांक आदींची माहिती ऑनलाईन सर्च इंजिनव्दारे उपलब्ध करुन देण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर दर्शनी भागावर मतदार यादी शोधा, या शिर्षकातंर्गत मतदारांच्या नावांनुसार व मतदान ओळखपत्र क्रमांकानुसार नागरिकांना स्वतः मतदार यादीत नाव शोधण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच महापालिका मुख्यालयात हेल्पलाईन कक्षाची स्थापना करण्यात आली असून हा कक्ष ६ ते १० ऑक्टोबरपर्यंत व मतदानाच्या दिवशी ११ ऑक्टोबर रोजी दिवसभर सुरु राहणार आहे. याच कक्षामध्ये वेगवेगळया क्रमांकांची दुरध्वनी सेवाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. हा कक्ष प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त एल. के. चौरे यांच्या अधिनस्त कार्यरत राहणार आहे. मतदानाच्या दिवशी मतदार यादीतील नाव शोधण्यासह अन्य माहितीसाठी मतदारांनी या कक्षास संपर्क साधण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

राज
उमे
याद
दिल
आ

प्रभागात हा मुद्दा सध्या चवीचवीने चघळला जात आहे.

राबवत मतदारांमध्ये जनजागृती केली. सिडको

# मतदारांना मिळणार आजपासून 'पोलचीट'

पान १ वरून »

अनुक्रमांक, बूथ क्रमांक आदी माहिती मिळू शकेल. दरम्यान, शासकीय तंत्रनिकेतनच्या इमारतीत गुरुवारी सकाळी दहा वाजल्यापासून उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान यंत्रांची तपासणी त्याचबरोबर उमेदवारांच्या नावाची यादी लावून मतदान यंत्रे सील करण्याचे काम करण्यात आले.

या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह कर्मचारी उपस्थित होते.

## मतदारांसाठी हेल्पलाइन कक्ष

राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदारांसाठी महापालिकेच्या मुख्य कार्यालयात हेल्पलाइन कक्षाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती उपायुक्त रत्नाकर वाघमारे यांनी दिली. ते म्हणाले, की या कक्षामध्ये शुक्रवारी (ता. सहा) ते मंगळवारी (ता. दहा) यादरम्यान सकाळी आठ ते सायंकाळी सहा या वेळेत त्याचबरोबर मतदानाच्या दिवशी बुधवारी (ता. ११) पहाटे सहा ते सायंकाळी सहा या वेळेत काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या ठिकाणी प्रशासनाचे सहायक आयुक्त एल. के. चौरे हे अधिकारी म्हणून उपस्थित राहतील. या कक्षाचे दूरध्वनी क्रमांक (०२४६२) - २६२६२६, २३४४६१, २३०७२१ आणि २३०६०१ असे असून त्याद्वारे मतदारांना माहिती देण्यात येणार आहे.

# मतदार जागृतीसाठी सिडकोत महारॅली

नवीन नांदेड : प्रतिनिधी

महानगरपालिकेच्यावतीने मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विविध माध्यमातुन जनजागृती करण्यात येत आहे. यात सिडको भागातील शालेय विद्यार्थीची दि. ५ ऑक्टोबर रोजी जनजागृती रॅली काढण्यात आली .यावेळी मतदान करा व राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवा असे आवाहन मनपाचे आयुक्त गणेश देशमुख यांनी केले .

आज समाजात जितका सुशिक्षित वर्ग वाढत चालाय त्यांच्यात मतदान करण्यास निरुत्साह दिसुन येत आहे . त्यामुळे राजकारणात सक्षम उमेदवार निवडुन न येता इतर उमेदवाराच्या हाती सत्तेची चावी जात आहे . त्यामुळे आपल्या परिसराचा विकास होत नाही . यातुन भ्रष्टाचाराला आळा बसण्या ऐवजी तो अधिकच फोफावतच चालाय आहे . आपल्या परिसरातील मुलभुत सुविधा पुर्ण करण्यासाठी सक्षम उमेदवार निवडुन देण्यासाठी मतदान करावे यासाठी नांदेड वाघाळा महानगर पालिकेच्यावतीने रॅली काढुन मतदान जनजागृती करण्यात आली. . यासाठी मनपाचे आयुक्त गणेश देशमुख ,शिक्षण अधिकारी दिलीप बनसोडे , सहा आयुक्त अविनाश अटकोरे , विलास गजभारे , ऐडके मॅडम याच्यासह मनपाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती . सिडको - हडको परिसरातील इंदिरा गांधी हायस्कुल , शिवाजी विद्यालय , नृसिंह विद्यामंदिर , छत्रपती शिवाजी विद्यालय , विवेकवर्धीनि प्राथमिक शाळा , प्रियदर्शनी प्राथमिक शाळा , कुसुमताई प्राथमिक शाळा , कस्तुरबा माता प्राथमिक शाळा , ज्ञानगंगा प्राथमिक , विद्यानिकेतन प्राथमिक शाळा , अल्मा इक्बाल प्राथमिक उर्दु शाळा , बापुसाहेब प्रथमिक शाळा , संतोष कन्या शाळा याच्यासह परिसरातील विविध शाळांनी यात सहभाग घेतला होता .




# मोडेन पण वाकणार नाही; शिवसेना सोडणार नाही

२०

नांदेड : प्रति

# निवडणूक विभाग आजपासून वोटर स्लीप वाटणार

नांदेड,दि.५: मतदारांना त्यांचे मतदानकेंद्र व मतदार यादीतील अनुक्रमांक कळण्यासाठी मनपाच्या निवडणूक विभागाकडून शुक्रवारपासून (दि.६) वोटर स्लीप वाटण्यास सुरूवात करण्यात येणार आहे, अशी माहिती उपायुक्त (विकास) रत्नाकर वाघमारे यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ४५० मतदानकेंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि मनपाच्या ८८ बिल कलेक्टरची नेमणूक करण्यात आली आहे. दि. ६ ते ९ ऑक्टोबर या काळात घरोघरी जाऊन मतदारांना वोटर स्लीप वाटली जाईल. ज्या मतदारांना ही स्लीप मिळाली नाही त्यांच्यासाठी महापालिकेत दि.९ व १० रोजी स्लीप देण्याची व्यवस्था करण्यात येईल. याशिवाय मुख्य नियंत्रण कक्षात २६२६२६ क्रमांकावर हेल्पलाईनची स्थापना करण्यात आली असून मतदारांना त्यांच्या मतदारयादीतील नावाची माहिती दिली जाणार आहे. सिडको भागात मनपा आयुक्त गणेश देशमुख यांच्या उपस्थितीत मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. त्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाल्याचे वाघमारे यांनी नमूद केले. यावेळी उपायुक्त (निवडणूक) संभाजी वाघमारे, शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे उपस्थित होते.

## ... येथील ग्रामसेवकाच्या निलंबनाची मागणी

तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी केले आहे.

# मतदानासाठी विद्यार्थ्यांनी पालकांना जागृत करावे - आयुक्त देशमुख

► लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे. यामुळे एक चांगला प्रतिनिधी निवडून देण्याची संधी आपल्याला प्राप्त होते. ह्या मतदानासाठी प्रत्येक घरातील नागरिकांनी सहभागी होणे आवश्यक आणि त्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या पालकांना, शेजाऱ्यांना आणि नातेवाईकांना मतदान करण्यासाठी जागृत करून या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

महापालिका निवडणुकीच्या मतदार जागृती अभियानांतर्गत सिडको - हडको परिसरातील शाळांच्या विद्यार्थ्यांना माँ जिजाऊ सृष्टी मैदानावर विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी मनपाचे शिक्षणाधिकारी दिलीप बनसोडे, क्षेत्रिय अधिकारी अविनाश अटकोरे, विविध शाळांचे मुख्याध्यापक व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, विद्यार्थी हा समाजाचे भविष्य आहे. या विद्यार्थ्यांनी आज मतदान प्रक्रियेत स्वत: सक्रिय सहभाग घेतला तर भविष्यात त्यांनाही त्यांचा लोकप्रतिनिधी कसा असावा व त्याची निवड कशी करावी याचे ज्ञान होईल. त्यामुळे येणाऱ्या ११ ऑक्टाबर रोजी विद्यार्थ्यांनी आई-वडील, घरातील सर्व मतदार, शेजारी, नातेवाईक यांना मतदान करण्यासाठी प्रवृत्त करावे, असेही ते म्हणाले.

# मनपा मतदानाची तयारी अंतिम टप्प्यात

## उपायुक्त रत्नाकर वाघमारे यांची माहिती

नांदेड : प्रतिनिधी

नांदेड - वाघाळा शहर महापालिकेने सार्वत्रिक निवडणूक २०१७ साठी केलेली तयारी अंतिम टप्प्यात आली असून ८० बिल कलेक्टर आणि ५५० बुथ लेव्हल ऑफिसर यांना वोटर स्लीप देण्यात आली आहे. जवळपास ४ लाख मतदार असून या मतदारापर्यंत वोटर स्लीप पाठविण्यासाठी ६ ते ८ ऑक्टोबरपर्यंत वेळ देण्यात आली असून ८ तारखेनंतर जर कोणाला वोटर स्लीप मिळाली नसेल तर त्यांनी मनपा निवडणूक कार्यालयाशी ९ ऑक्टोबर रोजी संपर्क साधावा, असे सांगून ते म्हणाले, सकाळी साडेसात ते साडेपाच या दरम्यान ११ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, असे आवाहन या पत्रपरिषदेत उपायुक्त रत्नाकर वाघमारे यांनी केले.



महापालिकेच्या निवडणुकीसाठी ५७८ उमेदवार रिंगणात असून ५५० मतदान केंद्र सुसज्ज करण्यात आले असून प्रत्येक उमेदवाराचे इव्हीएम मशिनवर उमेदवाराचे नाव व चिन्ह टाकण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. येणाऱ्या १४ हवामान खात्याने अतिवृष्टी होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे कुठलाही व्यत्यय येऊ नये यासाठी मनपा निवडणूक विभागाने पूर्णतः काळजी घेतली आहे. राज्य निवडणूक आयोगाने नांदेड मनपा निवडणूक ६ सप्टेंबर रोजी जाहीर केली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ११ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्षात मतदान होणार आहे.




मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान केंद्राचे नाव, ठिकाण, मतदारांचे अनुक्रमांक, बुथ क्रमांक आदी माहिती ऑनलाईन सर्च इंजिन द्वारे उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर दर्शनी भागावर मतदार यादी शोधा या शिर्षकाअंतर्गत मतदाराच्या नावानुसार व मतदान ओळखपत्र क्रमांकानुसार नागरिकांना स्वतः मतदार यादीत नाव शोधण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महापालिकेच्या मुख्य कार्यालयात हेल्पलाईन कक्षाची स्थापना करण्यात आली असून सदरील कक्षात ६ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबरपर्यंत सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आणि प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदरील कक्षामध्ये निवडणुकीसंबंधी शहरातील नागरिकांच्या सुविधेसाठी मनपा प्रशासनाने दुरध्वनी क्रमांक २६२६२६, २३४४६१, २३०७२१, २३०६०१ उपलब्ध करून दिलेले आहेत. सदरील कक्षाधिकारी एल.के. चौरे यांना कार्यान्वित करण्यात आलेले आहे. मनपा प्रशासनाने मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान यादीतील नाव शोधणे अथवा इतर माहितीसाठी शहरातील नागरिकांनी मनपाकडे संपर्क साधण्याचे आवाहनही वाघमारे यांनी केले आहे.

यावेळी उपायुक्त संभाजी वाघमारे, प्रसिद्धीप्रमुख बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

असलेल्या भाजप सरकारने घेतली, अन्यथा त्या कर्जाचे कारभाराची पोलखोल करताना कामगार मंत्री म्हणाले की, गुरू ता आणि पाणी पुरवठा योजनांचा पुरता बोजवारा उडाल्याचा काढण्याची ग्वाहीदेखील कामगार मंत्र्यांनी दिली.

# मतदारांना मतदानासाठी भरपगारी सुटी

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणुक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असला तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी बुधवार 11 ऑक्टोंबर रोजी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त नांदेड यांनी केले आहे.



ही सुट्टी सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींना लागू राहील. जसे राज्य शासन, केंद्र शासन व खाजगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॅपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदी. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी आदींना पुर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल

ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधीत महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधीत आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.

सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने आदींच्या मालकांनी, व्यवस्थापनाने या आदेशाचे अनुपालन होईल याची खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानासाठी योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्या विरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे शासन परिपत्रक मध्ये नमुद केले आहे.